# जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४–२१०१५१ ईमेल आयडी : mahdhunansc@aij.gov.in

म.जा.क्र. (रो.व वि.) ५०४ /२०२६ दिनांक : ११ /०२/२०२६

## निविदा

प्रति,

____________________
____________________
____________________

**विषय :** जिल्हा न्यायालय, नंदुरबार व अधिनस्थ न्यायालयांतील कार्यरत बेलीफ कर्मचारी यांचेकरीता १३ नग रेनकोट पुरवठा करणेबाबत...

उपरोक्त विषयांस अनुसरून व मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. नंदुरबार यांचे आदेशान्वये कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय नंदुरबार व अधिनस्थ न्यायालयांतील कार्यरत बेलिफ यांचेकरिता १३ नग रेनकोट आगामी पावसाळयात वापरण्याकरिता खरेदी करावयाचे आहेत.

त्याकरिता नोंदणीकृत विक्रेत्यांकडून सिलबंद पाकीटात निविदा मागविण्यात येत आहेत. तरी आपण आपली निविदा म.जिल्हा न्यायालय, नंदुरबार टोकरतलाव रोड, नंदुरबार या पत्यावर सिलबंद पाकीटात **दिनांक** १६ /०२/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी दुपारी २.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

### अटी व शर्ती :–

१. दरपत्रक/निविदा आवश्यक त्या संपूर्ण तपशील व मोबाईल नंबरसह मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नंदुरबार यांच्या नावे असावे व लिफाफयावर "**Quotation for Rain Coat**" असे ठळक अक्षरात लिहावे.
२. एकूण १३ नग रेनकोटचे दर सर्व करांसहीत नमूद करावे.
३. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके/निविदा स्विकृत केली जाणार नाहीत.
४. दरपत्रक मान्य/अमान्य अथवा पुर्णपणे रद्द करण्याचे सर्व अधिकार कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
५. पुरवठा करण्यात येणारे रेनकोट हे सुस्थितीत व चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक आहे.
६. सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पुरवठादारास रेनकोट पुरवठा आदेश दिल्यानंतर संबंधितांनी पुढील ०७ दिवसांच्या आंत म.जिल्हा न्यायालय, नंदुरबार येथे स्व:खर्चाने रेनकोटचा पुरवठा करावा लागेल.
६. सदर निविदा खरेदी समिती यांचेसमक्ष उघडवितांना आपणास खरेदी समिती नंदुरबार यांचे समक्ष हजर राहणे बंधनकारक राहील, त्याबाबत आपणास कळविण्यात येईल.
७. वस्तुंचा पुरवठा केल्यानंतर त्या संबंधीचे देयक कार्यालयात सादर करावे लागेल. देयक सादर केल्यानंतर कार्यालयामार्फत आपल्या देयकाची रक्कम अदा करणेसंबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

नंदुरबार
दिनांक ११ /०२/२०२६

आदेशावरुन,

११/२/२६

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, **नंदुरबार**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :**
१. नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार.
२. संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार
**यांना जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटर अपलोड करणेसाठी**

D:\2020-2021\Cash and Finance\Tipani and order\Raincoat and Umbrella Purchasing for Bailif\Raincoat.odt